॥ देवी सरस्वती ॥

कालिदासांना ही जाणीव झाली होती कि ते खूप मोठे ज्ञानी झालेत. एकदा प्रवासात त्यांना तहान लागली. त्यांनी पाहिले कि जवळ एक वृद्ध स्त्री विहिरीवरून पाणी भरत आहे. कालिदास म्हणाले, माते मला पाणी देशील तर तुला खूप पुण्य मिळेल. वृद्ध स्त्री म्हणाली, बाळा मी तुला ओळखत नाही, कृपया तू तुझा परिचय दे, मग मी तुला पाणी देते. मग कालिदासाने परिचय द्यायला सुरुवात केली.

कालिदास म्हणाले मी प्रवासी आहे.

वृद्ध स्त्री म्हणाली: प्रवासी तर फक्त दोनच आहेत. एक चंद्र  आणि दुसरा सूर्य  जे दिवस रात्र चालतच असतात.


कालिदास म्हणाले मी अतिथी आहे पाणी मिळेल?
वृद्ध स्त्री म्हणाली:- अतिथी फक्त दोनच आहेत. एक धन आणि दुसरे तारुण्य ते निघून जातात. खरं सांग, तू कोण आहेस?
कालिदास म्हणाले:- मी सहनशील आहे आता तरी पाणी मिळेल?
सहनशील तर फक्त दोनच आहेत एक धरती  आणि दुसरं झाड  जी पुण्यवान लोकांच्या बरोबर पापी लोकांचं देखील ओझं घेऊन आहे. आणि झाडं त्यांना दगड मारला तरी ती मधुर फळंच देतात.
कालिदास आता हतबल झाले. कालिदास म्हणाले मी हट्टी आहे.
वृद्ध स्त्री म्हणाली:- नाही तू हट्टी कसा असशील!
हट्टी तर फक्त दोनच- एक नख  आणि दुसरे  केस कितीही कापले तरी परत वाढतातच.
कालिदास आता कंटाळले आणि म्हणाले, "मी मूर्ख आहे."
वृद्ध स्त्री म्हणाली:- मूर्ख तर फक्त दोनच आहेत.
एक राजा  ज्याची योग्यता नसताना तो सर्वांच्यावर राज्य करतो. आणि दुसरा पंडित  जो राजाला रिझविण्यासाठी चुकीच्या गोष्टीला खरं सिद्ध करण्याची चेष्टा करतो.

कालिदास आता काही ही बोलण्याच्या मन:स्थितीत नव्हते. ते त्या स्त्रीच्या पायावर डोकं ठेवून पाण्यासाठी विनवणी करु लागले. वृद्ध स्त्री म्हणाली उठ बाळ, आवाज ऐकून कालिदासांनी वर पाहिलं तर त्या स्त्रीच्या जागी साक्षात "सरस्वती देवी" उभी होती. कालिदास आता नतमस्तक झाले. सरस्वती देवी कालिदासांना म्हणाली,

शिक्षणाने ज्ञान येते, अहंकार नाही. शिक्षणाच्या बळावर मिळालेला मान सन्मान आणि प्रतिष्ठा मलाच तू सर्वस्व समजलास आणि त्यामुळे अहंकार झाला. तुझे डोळे उघडणे आवश्यक होते. कालिदासांना त्यांची चूक समजली ते भरपूर पाणी पिऊन पुढील प्रवासाला निघाले.

तात्पर्य :— विद्वत्तेवर कधीच गर्व करु नका. स्वतः खूप शहाणे हुशार असाल पण समोरचा त्याच्या मानाने तो असतो. ८४ लाख जीवांमध्ये फक्त माणूस पैसे कमावतो. पण कुठलाच जीव उपाशी रहात नाही. आणि माणूस पैसे कमवून सुध्दा त्याचे पोट कधीच भरत नाही.

— श्री —



सौ. स्मिता लिमये
वृंदावन कॉम्प्लेक्स
कोथरूड.

[संग्रहीत]